

गुहागर पंचायत समिती आरक्षण जाहीर ; महिला व पुरुषांना फिफ्टी फिफ्टी संधी

पान ३

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

दिवाळीत प्रवाशांना एस.टी. तून स्वस्तात मस्त 'आवडेल तेथे प्रवास'!

पान ८



रत्नागिरी ● मंगळवार १४ ऑक्टोबर,२०२५ RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० ● वर्ष २१ ● अंक ३३१ ● पाने ८ ● ₹ ५.०० www.prahaar.in epaper.prahaar.in


# रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या ५६ गटांसह नऊ पंचायत समितींच्या ११२ गणांची आरक्षण सोडत झाली जाहीर

## जिल्ह्यातील काही इच्छुकांना लॉटरी तर काही दिग्गजांना बसला धक्का

**रत्नागिरी (विशेष प्रतिनिधी)**

जिल्हा परिषद अध्यक्ष व पंचायत समित्यांच्या सभापती पदासाठींची आरक्षण सोडत झाल्यानंतर अनेकांचे लक्ष लागून राहिलेल्या जिल्हा परिषदेच्या ५६ गटाचे तसेच ९ तालुका पंचायत समित्यांच्या एकूण ११२ गणांची आरक्षण सोडत सोमवारी जाहीर झाली. यामध्ये काही इच्छुक दिग्गजांना फटका बसला आहे. तर काहींना मात्र लॉटरी लागली आहे. जिल्हा परिषदेच्या ५६ पैकी २८ गट हे महिला आरक्षित झाले आहेत. या आरक्षण सोडतीत जिल्ह्यातुन यापूर्वी जिल्हा परिषदेवर प्रतिनिधित्व केलेल्या काही मातब्बरांना लॉटरी लागली आहे. तर काहींना त्यांचे गट आरक्षित झाल्याने फटका बसला आहे. त्यामुळे काहींना अन्य मतदार संघ शोधावे लागणार आहेत.



गतसप्ताहातच जिल्हा परिषद अध्यक्ष व पंचायत समित्यांच्या सभापती पदासाठींची आरक्षण सोडत झाली. यात जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद हे नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव झाले आहे. तर नऊ पंचायत समित्यांपैकी पाच पंचायत समितीची सभापतीपदे ही महिलांसाठी आरक्षित झाली आहेत.

यानंतर आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या जिल्हा परिषद गटांची आरक्षण सोडत जिल्हाधिकारी कार्यालयात तर पंचायत समिती गणांची आरक्षण सोडत त्या त्या तालुका ठिकाणी काढण्यात आली.

नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी (ओबीसी) २७ टक्के आरक्षणानुसार १५ जागा राखीव ठरविण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या आरक्षण सोडतीचा शुभारंभ श्रेयांश कुर्णे या छोट्या मुलाच्या हस्ते करण्यात आला. या सोडतीच्या वेळी जिल्हाधिकारी मनुज जिंदल, निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी आणि अपर तहसीलदार सचिन गोसावी उपस्थित होते.

सुरूवातीला हातखंबा, वाटद आणि हर्णै हे तीन गट अनुसूचित जाती जमातीसाठी आरक्षित करण्यात आले. यामध्ये वाटद (रत्नागिरी) हा अनुसूचित जाती महिलासाठी तर हर्णै (दापोली) हा गट अनुसूचित जमाती महिलासाठी तसेच हातखंबा (रत्नागिरी) हा गट अनुसूचित जातीसाठी राखीव झाला आहे. यानंतर नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी आरक्षण काढण्यात आले. यामध्ये लोटे (खेड), दाभोळ (दापोली), कोंडकारूळ (गुहागर), शिरगाव (चिपळूण), भरणे (खेड), अलोरे (चिपळूण), विराचीवाडी (खेड), पालगड (दापोली) तर नागरिकांचा मागास प्रवर्गसाठी नाचणे (रत्नागिरी), सुकिवली (खेड), पडवे (गुहागर), शृंगारतळी (गुहागर), भडगाव (खेड),

(पान २ वर)

**जिल्हा परिषद आरक्षण गटनिहाय संवर्ग**

- ७ नागरिकांचा मागास प्रवर्ग
- ८ नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री
- १८ सर्वसाधारण स्त्री
- २० सर्वसाधारण
- १ अनुसूचित जाती
- २ अनु.जातीजमाती स्त्री

# एसटी कर्मचाऱ्यांना ६ हजार रुपये दिवाळी भेट

## वेतनवाढीच्या फरकाचा हप्ता आता वेतनासोबत देणार

**दिवाळी अग्रीम म्हणून १२ हजार ५०० रुपये**




**मुंबई (प्रतिनिधी):**

एसटीच्या सुमारे ८५ हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा तसेच वेतन वाढीचा फरक वेतनासोबत देण्यासाठी महामंडळाला दरमहा ६५ कोटी रुपये देण्याचा आणि पात्र कर्मचाऱ्यांना दिवाळी अग्रीम म्हणून १२ हजार ५०० रुपये देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी येथे जाहीर केला.

एसटीच्या सर्व कर्मचारी संघटनांची आणि कृती समितीची बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. या बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नविन सोना, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, परिवहन विभागाचे अपर

(पान २ वर)

# आजपासून ४ दिवस वादळी पावसाची भीती

## हवामान विभागाचा अंदाज

**मुंबई ( वृत्तसंस्था) :**

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील अनेक भागात हवामान पूर्णपणे कोरडे होते, ज्यामुळे मान्सूनचा राज्यातून परतीचा प्रवास झाल्याचे बोलले जात होते. मात्र, आता नव्या अपडेट्सनुसार, हवामानात अचानक बदल होण्याची शक्यता आहे. १४ ऑक्टोबर पासून राज्यातील हवामानात परत एकदा बदल अपेक्षित असून १५, १६ ऑक्टोबरपर्यंत विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात ढगाळ हवामान आणि दुपारनंतर वादळी पाऊस अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना काढणी केलेल्या पिकांची काळजी घेण्याचे आवाहन सरकारकडून करण्यात

(पान २ वर)

## वेचक

### दहावी, बारावी परीक्षांच्या तारखा जाहीर

**पुणे (प्रतिनिधी):** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी - मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी, बारावीच्या लेखी परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या. इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारीपासून तर दहावीची लेखी परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरु होणार आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत इयत्ता बारावी, दहावीची लेखी, प्रात्यक्षिक व इतर परीक्षा घेण्यात येणार आहेत. या परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. यात इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत होणार आहेत. माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या ऑनलाईन परीक्षाही याच कालावधीत होणार आहे.

(पान २ वर)

### कोल्ड्रिफ कफ सिरप कंपनीला ठोकले टाळे

**तिरुअनंतपुरम ( वृत्तसंस्था) :** कोल्ड्रिफ कफ सिरपमुळे झालेल्या मृत्यूंनंतर तामिळनाडू सरकारने महत्त्वपूर्ण कारवाई केली आहे. कफ सिरप बनवणारी कंपनी श्रीसन फार्मास्युटिकल कंपनीचा परवाना रद्द करण्यात आला आहे. मध्य प्रदेशात या कफ सिरपमुळे २५ मुलांचा मृत्यू झाला आहे. तामिळनाडू ड्रग्ज कंट्रोल डिपार्टमेंटने कंपनीविरुद्ध ही कठोर कारवाई केली आहे. राज्य आरोग्य विभागाच्या म्हणण्यानुसार, चौकशी पूर्ण झाल्यानंतर कंपनी औपचारिकपणे बंद करण्यात आली आहे. कोल्ड्रिफ कफ सिरपमध्ये डायथिलीन ग्लायकोलचे (डीईजी) प्रमाण जास्त असल्याचे दिसून आले आहे.तामिळनाडू सरकारने

(पान २ वर)

# नातूनगर येथे मध्यरात्री कारला अचानक आग

## कारमधील तीन प्रवासी वेळीच बाहेर पडल्याने जीवितहानी टळली



**खेड (प्रतिनिधी)**

सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास २:५० वाजता खेड तालुक्यात नातूनगर येथे मर्सिडीज बेंझ कारला अचानक आग लागली. ही आग खेड नगर परिषदेच्या अग्निशमन दलाच्या तत्परतेने विझवण्यात आली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

या बाबत सविस्तर माहिती अशी की, नाशिक येथील संदेश राजेश चवळे हे आपल्या मालकीची एमएच ०२ बीझेड १४०० क्रमांकाची मर्सिडीज बेंझ कार घेऊन नाशिक ते गणपतीपुळे असा प्रवास करीत होते. या मार्गावर प्रवास करत

(पान २ वर)

# सिंधुदुर्ग जिल्ह्यात एस.टी. महामंडळाची सेवा सक्षम होणार

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी आमदार निलेश राणे यांची चर्चा

**बसेसची संख्या वाढवून ओरोस बसस्थानकाचा विस्तार करण्याचे मंत्री सरनाईक यांनी दिले निर्देश**



**मुंबई :**

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या भौगोलिक विस्ताराचा विचार करताना दळणवळण वाढून शेवटच्या घटकालाही सेवा मिळावी, तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात राज्य परिवहन महामंडळाच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करावे. यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात एस.टी. बसेसची संख्या वाढवावी, तसेच बसस्थानकांचे विस्तारीकरण करावे, अशी आग्रही मागणी आमदार निलेश राणे यांनी मंत्रालयात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासोबत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एस.टी. महामंडळाशी संबंधित विविध विषयांबाबत बैठक झाली त्यावेळी केली. या मागणीचा विचार करून मंत्री प्रताप सरनाईक यांनीही सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या भौगोलिक विस्ताराचा विचार करून त्या प्रमाणात बसेस देऊन परिवहन सेवा सक्षम करावी, असे निर्देश एस.टी. महामंडळास दिले आहेत.

मंत्रालयात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एस.टी. महामंडळाशी संबंधित विविध विषयांबाबत बैठक झाली. या बैठकीला आमदार निलेश राणे, एस.टी. महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर

(पान २ वर)

# विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या रिक्षाला डंपरची धडक

## एका विद्यार्थ्यासह रिक्षा चालक जखमी

**रत्नागिरी,(वार्ताहर)**

रत्नागिरी शहरानजीकच्या कदमवाडी-मजगांव रस्त्यावर अज्ञात डंपर चालकाने विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या रिक्षाला धडक दिली. या अपघातात एका विद्यार्थ्यासह रिक्षा चालक जखमी झाला. त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

विद्यार्थी रियान सावकार व रिक्षा चालक जाहीदअली अब्दुलरहिम धामस्कर (वय ५०, रा. मजगाव, रत्नागिरी) अशी जखमींची नावे आहेत. ही घटना सोमवारी (ता. १३) दुपारी चारच्या सुमारास मजगाव-कदमवाडी रस्त्यावर घडली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रिक्षा चालक

(पान २ वर)

# राजापुरात दुचाकी चोरट्यांची दहशत कायम

## रविवारी मध्यरात्री राजापूर शहरात दुचाकी चोरीचा प्रयत्न जागरूक नागरिकांमुळे फसला

**पोलिसांपुढे दुचाकी चोरांच्या तपासाचे कडवे आव्हान**

**राजापूर (प्रतिनिधी)**

तालुक्यात दुचाकी चोरीचे सत्र सुरूच असून शुक्रवारी शहरातील कोंढेतड, भंडारवाडी परिसरातून चोरट्याने काळ्या रंगाची स्प्लेंडर प्लस लांबविल्याची घटना ताजी असतानाच रविवारी रात्री शहर बाजारपेठेतून अशाप्रकारे दुचाकी चोरीचा प्रयत्न झाल्याची माहिती पुढे आली आहे. अशाप्रकारे दुचाकीच्या बाजुला संशयास्पदरित्या वावरणाऱ्या दोन तरूणांना काही जागरूक नागरिकांनी हटकल्यानंतर त्या दोघांनी धूम ठोकली व त्यांचा दुचाकी चोरीचा प्रयत्न फसल्याचे पुढे आले आहे. मात्र या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल झालेली नाही. मात्र गेल्या काही दिवसात वारंवार घडणाऱ्या दुचाकी चोरीच्या घटनांमुळे राजापुरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तालुक्यातील नाटे, कोदवली आणि कोंड्ये या भागांत चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. कोंड्ये येथे पहिली दुचाकीची चोरी झाली होती. त्यानंतर २६ सप्टेंबर रोजी नाटे गावातून एकाची दुचाकी चोरीला गेली होती. दुसऱ्या दिवशी म्हणजेच २७ सप्टेंबर रोजी पहाटे ४.३० वाजण्याच्या सुमारास कोदवली साईनगर भागातून आणखी एक दुचाकी चोरीला गेली होती. मात्र ही दुचाकी दोन दिवसानंतर कोल्हापूर मार्गावरील गटारात बेवारस अवस्थेत

(पान २ वर)

# महाराष्ट्रात मंकी पॉक्सचा शिरकाव!

## धुळ्यात आढळला पहिला रुग्ण

**धुळे (प्रतिनिधी):**

जगभरात थैमान घालणाऱ्या मंकी पॉक्सचा राज्यातील पहिला रुग्ण धुळ्यात आढळून आला आहे. त्यामुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली. रुग्णाचे दोन्ही रिपोर्ट पॉझिटीव्ह आल्याने हिरे रुग्णालय प्रशासनही सतर्क झाले आहे. मंकी पॉक्स हा संसर्गजन्य आजार असल्याने रुग्णाला स्वतंत्र विलगीकरण कक्षात दाखल करण्यात आले असून त्याच्या संपर्कातील व्यक्तींचा शोध घेण्यासाठी महापालिकेला कळविण्यात आले आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनाही याबाबत सुचित करण्यात आले आहे.

मंकी पॉक्स बाधित रुग्ण २ ऑक्टोबर रोजी तो सौदी अरेबियाहून धुळ्यातील गरीब नवाज नगर येथे आला होता. गेल्या चार वर्षांपासून

(पान २ वर)

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीला मिळणार घवघवीत यश

## मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला विश्वास, युतीसंदर्भात कार्यकर्त्यांना सूचना



**मुंबई :**

महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, नगरपंचायत या निवडणुका होऊ घातल्या आहेत. या निवडणुकीच्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी या बैठकांचं सत्र सुरु आहे. यापूर्वी मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र या चार विभागातील बैठका पूर्ण केल्या आहेत असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संपूर्ण राज्याच्या विभागात दौरे लावल्याचे फडणवीस म्हणाले. ज्या इंदिराजींनी संघावर बंदी घातली, त्यांना सत्तेवरुन पायउतार व्हावं लागल्याचे फडणवीस म्हणाले.

**युती झाली पाहिजे अशी आमच्या सूचना**

आज सायंकाळी नागपूर विभागाचा आढावा घेण्यात येईल. पुढील आठवड्यात मुंबई विभागाचा देखील आढावा घेणार असल्याचे फडणवीस म्हणाले. निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांची मानसिकता चांगली आहे. पार्टी देखील सज्ज आहे. आढाव्यामध्ये कार्यकर्त्यांना दिशा निर्देशके देऊन सूचना केल्याचे फडणवीस म्हणाले. युती संदर्भात देखील सूचना देतो आहे. युती झाली पाहिजे अशा आमच्या सूचना आहेत. युती झाली नाही तरी

(पान २ वर)

# आयआरसीटीसी घोटाळा प्रकरणात लालू प्रसाद यादव कुटुंबाच्या अडचणीत वाढ

## न्यायालयाने आरोप केले निश्चित

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था):**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या तयारी दरम्यान, आयआरसीटीसी घोटाळा प्रकरणात लालू प्रसाद यादव कुटुंबाच्या अडचणी वाढल्या आहेत. दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयाने सोमवारी आरजेडी सुप्रीमो लालू प्रसाद यादव आणि बिहारचे विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांच्यासह सर्व आरोपींविरुद्ध आरोप निश्चित केले, म्हणजेच आता त्यांना या प्रकरणात खटल्याला सामोरे जावे लागणार आहे.

(पान २ वर)

# हमासच्या कैदेतून सर्व २० इस्त्रायली ओलिसांची सुटका

**जेरुसलेम (वृत्तसंस्था):**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गाझामध्ये सुरू केलेल्या शांतता योजनेला यश आले आहे. इस्त्रायल आणि हमास यांनी ट्रम्प यांच्या शांतता योजनेवर सहमती दर्शवली आहे. गाझामध्ये दोन वर्षांपासून सुरू असलेल्या विनाशकारी संघर्षाचा

(पान २ वर)

# देशाची 'स्पेसटेक'मध्ये ऐतिहासिक झेप

## भारताचा पहिला खासगी उपग्रह मिशन दृष्टी लवकरच होणार प्रक्षेपित

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था):**

भारताची आघाडीची अवकाश-तंत्रज्ञान स्टार्टअप कंपनी गॅलक्सीआयने आपल्या महत्त्वाकांक्षी उपग्रह मालिकेची घोषणा केली. या मालिकेतील त्यांचा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा उपग्रह 'मिशन दृष्टी' २०२६ च्या पहिल्या तिमाहीत प्रक्षेपित होणार आहे.

हे प्रक्षेपण गॅलक्सीआयच्या मोठ्या उपक्रम कार्यक्रमाचे नेतृत्व करेल, ज्यात कंपनीचे २०२९ पर्यंत ८ ते १२ उपग्रह अवकाशात स्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे. या उपग्रहांमुळे जवळपास रिअल-टाइम



(पान २ वर)

# उद्योग क्षेत्रामध्ये महाराष्ट्राला कायम 'एक नंबर'वर ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न - उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत

## महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कारांचे वितरण

**मुंबई :**

महाराष्ट्राला उद्योग क्षेत्रात कायमस्वरूपी 'एक नंबर'वर ठेवण्यासाठी जे काही करावे लागेल, ती सर्व ताकद उद्योजकांना देण्याची राज्य शासनाकडून तयारी आहे, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.



२०२२- २३ आणि २०२३-२४ या वर्षांकरिता 'महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कार २०२५'चे वितरण मराठी भाषा व उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या पुरस्कार वितरण समारंभात उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीनकुमार सोना, उद्योग सचिव डॉ. पी. अन्बळगन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंदर सिंह, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, अतिरिक्त विकास आयुक्त वैभव वाघमारे तसेच पुरस्कार विजेते निर्यातदार उद्योजक उपस्थित होते.

उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत म्हणाले की, राज्याच्या निर्यातीचे गुणोत्तर दहा पटीने वाढवण्यासाठी १२ नवीन धोरणे आणली जात आहेत. यात एव्हीजीसी, जीसीसी, बांबू, लेदर, एरोस्पेस, इलेक्ट्रॉनिक्स यासारखी धोरणे लवकरच येणार आहेत. या धोरणांमुळे उद्योजकांना दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दावोस, जर्मनी, जपान यासारख्या परदेश दौऱ्यांतील कराराद्वारे महाराष्ट्रात विक्रमी

(पान २ वर)